तिहरा वहरी

पयलो अंक

**२० एप्रिल २०१४**

# कादोडी

**पास्का हनाव विशेषांक**

खाजगी वितरन

**अंकाई किंमत**
**:- दा रुपय**

**संपादक :-** ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८) **Email :-** kadodivasai@gmail.com

**सहसंपादक :-** एडवर्ड डिसोझा **जाहिरात प्रमुख :-** सुनील डिमेलो

**संपादक मंडळ :-** सायमन रॉड्रिग्ज, डॅनियल मस्करणीस, राजन डिमेलो, जेम्सन डिमेलो, रॉबर्ट फर्नांडिस, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो.

**Web: -** www.onevasai.com **मुद्रक:-** मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व - ९७६५८७४४९३

## संपादकीय

सगळ्या कुपाऱ्यांना पास्का हनायो शुभेच्छा, परत एकदा आम्ये तुमाला भॅट्या आल्याव. आपलॉ यॉ "कादोडी" अंक सुरू हॉवॉन दोन वहरे जाले, प्रत्येक तीन मयन्याला आम्ये अंक घॅवॉन तुमश्या दरी येत्याव. तुम्ये खुब भारीस अहॉ सपोर्ट आतॅपोत आमाला कॅलॅ आन करते हात.. आपल्या भाषेत लोक विसार कऱ्या लागला, बोल्या लागला, आतॅ लिव्या पन लागला, आन त्यात विशेष मंजॅ आगाशी, मेरभाट श्या सिरील मिनेझिसनॅ ते आपल्या या अंका हारका आख्खाशे आख्खा आपल्या भाषेत अहलेला **"मिंगॅ रॅ"** ई पुस्तक प्रकाशित केला, जहॉ आपलॉ यॉ अंक एखाद्या बोलीभाषेत निघनारॉ एकमेव अंक हाय ताहास सिरीलसा पुस्तक पन एकमेव हाय.. सिरील, तूआ खास अभिनंदन.. आपले तरुन १७-१८ वहाराये पोरेपन आपल्या भाषेत लिव्या लागल्यात, या अंकात त्यायॅ लेख-कविता हात, आपली भाषा टिकव्या करता आमॅ जा रॉपटा लाविलता त्याई जतन कऱ्यादो फक्त आमॅस नात तर तुमॅ सगळेपन आमश्या जोडीला त्याला खतपानी कऱ्यादो आमश्या बरबर हात या कॉडा बरा वाटातॅ.

मंडळी, माला अडे एक विशेष मुद्दॉ मांड्यासॉ हाय, यॉ मुद्दॉ आपल्या देशभक्तीओर हाय, आपुन आपल्या धर्मामुळॅ देशाला किंमत देत नाय आहा खुब वेळा आपल्या कानोर पडाते पन जॅ लोक इ बॉलात्यात ते यॉ विसार नाय करीत की २६ जानेवारी आन १५ ऑगस्टश्या दिहा जिगाळा आपल्या देशायॅ खुब हिकलॅलॅ, सुसंस्कृत नागरिक रजा हाय भगून ९-१० वाजेपोत निजलॅलॅ आहात्यात तिगाळा आपलॉ वसयसॉ ख्रिस्ती माहनू हाकोटे नेहमीपेक्षा लवकर उठॉन देवळा जातॅ आन त्यानंतर आपल्या देशाआ तिरंग्याला सलामी देतॅ, माव सॉताव एक अनुभव, क्रिकेटश्या २०११ वर्ल्डकपशी पाकिस्तानबरबरशी मॅच, ऑफिसश्या कॅन्टीनमिने मॅच बग्याकरतान भोटी स्क्रीन लाविलती, लंचटाइम हॉता, आमॅ जीव्या बेहेलतॅ, वर्ल्डकपहारका भोटा इवेंट अहला गा खेळनाऱ्या दोनी देशाआ राष्ट्रगीत वाजवित्यात, त्यानुसार आपला राष्ट्रगीत सुरू जाला, मॅ ऊबी रॅलॉ, जोडीला जीव्या बेहलेलॉ ऑफिससॉ माव मित्र माला हांगातॅ, तू ऊबी क?, मॅ त्याला आन बाकी सगळ्यांना हांगीला, बाबांदो, आपल्या देशाआ राष्ट्रगीत सुरू जालॅ, आन त्या वॅळॅला ऊबी ऱ्यासा आहातॅ, यी माहिती नाय?, त्या १०-१२ जनामिने मॅ एकटॉ ख्रिस्ती हॉतॉ इ विशेष. "इलेक्शन"मिनॅ मतदान करना ई पवित्र काम हाय, आपल्या अडशे बार देशात हात ते होडले तॅ ९०-९५ टक्के मतदान हॉतॅ, इतर ठिकानसा लोक सहलीला जात्यात, मग खरॅ देशभक्त कून? आपुन सगळे नक्कीस मतदान कऱ्या जायद्या अही आशा हाय.

ख्रिस्तोफर रिबेलो, सोकाळा

**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान किंवा आपला या अंकाविषयी मत, तुमाला का आवडला, का नाय ता आमाला जरूर कळवा. आमश्या ई-मेल आयडी वर ई-मेल करा नाय तॅ फोन करा

**सूचना:-** कादोडी या अंकाव पाचवो अंक संज्यावश्या हनावेळेला, २२ जूनला प्रकाशित होणार. या अंकात तुम्हाला लेख कविता आहा कय साहित्य द्यासा हायदे ते १ जूनपर्यन्त **kadodivasai@gmail.com** मेल करा किंवा संपादक मंडळाला संपर्क करा.

**पास्काव हन सगळ्या वाचकांना खुब आनंदाव आन मजेऑ जाव अह्यो शुभेच्छा**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदेस आहा नाय.

# कागूळॉ

नेल्सन डिमेलो, जवतळा

१९७५ सा वहरी, मा बालपनासो एक परसंग !

माई भोटी बय माला सदा हांग्याशी “पॉरा, धान जीव, धाना पुडॅ बीआ कय नाय” ‘पन लानपनी माला धान डॅवॅसा नाय’. माला लटर फटर खाशी जाम होस. जड तडे जाम सापारे घ्यासॉ. कून माला कागूळॉ हांग्याशे तॅ कून उंदूर. तिगाळा खादो हॉतास का ? पन जा हाथा लागला ता गॉड लागला. तिगाळशी परिस्तितीस तही होती. तिगाळशा लॉकाई ताते विकिले आन बटर घॅटलॅ, कादो ? तॅ ओबडे तोंडे खादो आन ऑडॉडा ताता कुनाला पुरॅसा. पन तास ऑडॉडा ताता ३० पैशाला विकातोता आन त्या तीस पैशात ६ बटर याशे जॅ जकल्यांना पुरॅशॅ. आमशा जवतळया गावात ताते विकत घ्यादो तिगाळा एक माहनू यासॉ त्याला जकले ‘तातीकर’ नावानॅ ऑळख्याशे. गावशो बायको सडक्याला डॉळॅ लाऑन त्याई वाट बग्याश्यो. असो..

तॅ १९७५ शी कानी. आमे जुन्या घारा होते, मॅ जेमतेम ५ वहराव हॉतॉ. शाळीत जा सुरवात जालती बास. एकदी मॅ शाळीतसॉ आलॉ आन ओट्योर पाय टाकीतॅ ऑड्यात माला बऱ्यापैकी पकवानाव वास आलॉ. तांबडा गॉड पक्का ताविल्योर कॉहॉ वास येतॅ तॉहॉ वास माला आलॉ. माला उमजाला इ पकवान मास आत्लॅंगा सल्लॅ. मॅ दोन उडीत ऊबॉ रॅदो आत्लॅंगा. मा भोटया बायनॅ माला आत्लॅंगा जाता बगीला गा आन काकयला आड्डाली, “कगे, कागूळॉ शाळीतसॉ आलॉ हां, हाऊरॅआ टोपल्या मॅरॅ कुनॅ उबे रॅआ”. आमशा काकाआ हयरा जालता आन त्या हारोडीतनॅ हाऊरॉ आलतो. आत्लॅंगा पांडरा कापाड बांदलॅला टोपला ठोईलता पान मॅ शाळीतसॉ आलॉ इ कळता खोटी टोपल्या मॅरॅ शार बायकाआ कडा पडला. माई दादय अस्ती तॅ मा हाथा एक-अर्दी हिंगोळी लाविलोशी पन माई दादय भाटात. माई एक काकय हांगातॅ, "पॉरा, दि माळता लोक भाट्सा आला गा हाऊरॉ हॉड्यासॉ आन वाटनी करॅशी तिगाळा मा वाट्याई पन हिंगोळी मॅ तुला देनॅ पन आतॅ कय रगाजळ करॉ नाका". पन दि मावळ्यापोत माला धीर कडे हाय, मॅ आत-दारा करतॅ. माला टोपल्या पोत पॉशॅशॅ उकाम्बे लागल्यात. मॅ काकुळ वाकुळ जाले पन कय जमे नाय. हाऊरॉ घिती आल्ति टी बायकू आमशा ओहोरीत मा भोटया बयशा हरी खाटयात वार्ता करीत बेहल्ति. एक बी फेरी मॅ आत्लॅंगा मारली तव बगीतॅ माई एक काकय बाफिलेले ताते हॉकल्या लागले. मॅ विसार कॅलॉ हाऊरॅआ टोपल्यातशा हिंगोळीओर माव डाव लाग्या नाय पन बाफले ताते मा तॉडा लागू शकात्यात.

आमशा ओहरीत सदा काळोख अहॅसॉ. मॅ संधी बगिली आन आमशी व्यान आन माई भोटी बय बेहेलती त्या खाटया खाला खीरलॉ आन बाफिलेल्या तात्या बशीई वाट बगीते, तव मा काकयनॅ बशी हाडॉन खाटयात ठोईली. माई भोटी बय काकयला विसारतॅ, "आपलॉ कागुळॉ दिख्यासॉ रॅलॉ तॉ, खॅळॅ उड्लो वाटातॅ. पन टोपल्या मॅरॅ उबे रॅआ हां, नातॅ पटकान डॉळॉ सुकवीदॅ". खाटया खालनॅ मॅ जक्ला आयकातोतॉ. तात्याइ बशी जरा ऑंडा ठोईल्ती, माव हाथ पॉसात नॉतॉ. खाट हूंबाई गाथीलेली. मॅ खालनॅ बॉटाय हळूहळू बशी मॅरॅ हाडली. व्यान आन बय वारत्यात ओड्यो गुत्ल्योत्यो की हिंगात हिंग पक्कास गॅल्ता. मंग मॅ हळुस्कान हाथ वर काडॉन शारू शार फोडी ॲका बसक्यात टूकील्यो आन खाटया बुडा बॅहॉन खाल्यो. भोटी बय व्यानीला हांगाते, "तुमे हात लावा ना". व्यानीनॅ बशीला हाथ लावीलॉ पन हाथाला कय लागे नाय. ती बिशारी का बॉल्दॅ?

व्यान कय खाय नाय इ बगीला आन भोटी बय बोयली, " तुमे हात लावास ना ते, ओडे कादो लाजात्या, मॅस टूकॉन देतॅ धरा" आन मा बयनॅ बशीत हाथ घायलॉ तॅ तडे हाय का ? बशी सापसुप. मा बयनॅ बॉम्बाट कॅलॉ. "ओ माज्या दॅवा, या पॉरा पोटोर वालॉ लो. ॲनॅ सॉक्काट कॅला. सैतान उत्पान जाला कडने ला ? कॉड्ल्यानॅ अल्लामत ताता खाला, एक फोड पन बग्या ठोईली नाय ती ला". मॅ खाटया खालनॅ निंगालॉ आन आत्लॅंगा जाशा दारा खॉपा काळोखात निकलॉ. बय सॉ बॉम्बाट आयकॉन आत्लॅंगाशो बायको ओहोरीत धावल्यो. तव मॅ दारा खॉपातनॅ निंगालॉ आन आत्लॅंगा पॉसलॉ. टोप्ल्योरसा कापाड मॅरॅ कॅला आन एक मा वाट्याई आन एक मा त्या काकयशा वाट्याई अहयो

दोन हिंगोळ्यो तुमानीआ दोनू खिशात घायल्यो आन मिंगारनॅ जी धाव टाकीली तॉ मॅ ऊबी रॅदो रुमासतडे. मा मामारा.

(वि. सु. - माला ऑ परसंग नीट आठवात नॉतॉ पन आमशा घारा जिगाळा जुन्यो गोष्टी निंग्याश्यो तिगाळा माइ भोटी बय स्व. पिलीबाई दमेल या घटनेला सदा उजाळॉ द्याशी. माला माव ऑ पराक्रम आयकॉन जाम बरा वाट्यासा. मंडळी तुमाला पन वासॉन बरा वाटलॅ हायदॅ.)

# एप्रिल फूल - आलेस घोन्साल्वीस, आगाशी, शब्दरचना - शिमा लुद्रिक

सईत मयनॉ ताप्या लागलोतॉ. खांडानसॉ फरशा हाकोटे हाकोटे उठॉन साळपेठशा तलाशेटदर्शी ऊदार हाडलेली दानेदार खताई गून ॲका खांदयोर घॅऑन आन बी हाथा कुदळ घॅऑन केळीला खप घाल्या गॅलॉ. बनकेळी लागवड केल्ती बास. एक खप घायलॉ आन दुहरॅआ दिहा हिपना फिरविला गा पूडॅ यॅनारॅआ पहाळ्यामिनॅ केळीए बने मस्त हॉयद्यात अही त्याला खात्री होती.

केळीआ बाजूनॅ कुदळीॲ खिनॉन त्यात खत टाकॉन वर माती टाक्यासा काम करता करतायॅ त्याला हाफ लागली. आगायशा देवळा १२.३० सा घाट जाला तही त्यानॅ रेलेली खताई गून आन कुदळ नॅऑन राटोर ठोईली. रॅलॅला काम दॉपार नंतर करॉ आहा करॉन त्यानॅ दानडोरती हाथपाय धोईलॅ आन तॉ घारा आलॉ. “गला आज जिव्या का कॅलॅ ला ?” आहा विसारीत तॉ सुलीपूडॅ जातॅ तव त्या नाकुटामिनॅ करदी आंब्याऑ वास खिरलॉ. त्या तॉडाला पानी हुटलॉ. “गला मॅ ५ मिंटात आलॉ” आहा बॉलॉन तॉ खांदयोर सदरा टाकॉन खांडानशा भाटातनॅ घॉधारात बेबीदरी नवटाक मारॅ गॅलॉ. एक पइट मारॉन आन साकानाला मीठॅऑ खडॉ तॉडाट घॅऑन तॉ तॉहॉस हुरात हुरात घारा पॉसलॉ.

“गला जाम भूक लागले जिव्या दे सल” आहा बॉलातॅ तव तडने कातरवडीसॉ धुजू आलॉ आन फरशाला बोयलॉ, “गरॅ फरशा ! तुला शिमू कॉपातनॅ ताबोडतोब बोलविलॅ. कडे गावड्या जासा हाय आहा कयतरी हांगातोतॉ”. शिमू मीनजॅ कातरवडीसॉ भॉटॉ माहनू. “गला ! थॉडा थांम मॅ पटकान शिमू कॉपात दरी जाऑन येतॅ. आल्योरतीस आपुन ॲका लागली जीऑ.”

तॉहॉस त्या निमरामीनॅ फरशा नवाळा बिदीला लागलॉ. कातरवडीत शिमूआ घारा पॉसलॉ. “कॉपात ! हा कडे ?” फरशानॅ ओट्योरनॅस हाक मारली. तव शिमूई दुमी बार आली.
“वाये, कुपारी ऑड्या पारा यॅना कॅला ता?”
“कुमारी, शिमू कॉपातनॅ बोलविलता तॅ आलॉ”.
“कतॅ बोलविलता ? कॉपात तॅ लोंगरे घॅऑन मंबय गॅलॅ. ते दी माळता या गेले.”

मनाश्शा मनामीनॅ फरशाऑ जालॉ जाम संताप. “या धुजूआ मायला रे... यानॅ आहा काहा हांगीला ?” आन ऑड्यात फरशा डॉख्यात टुप पेटली. तॉ तॉहॉस तडाक जलाडीमीनॅ धुजूआ हारोडी गॅलॉ. तडे गेल्योर जीवॉन ओट्योरतीस बॅहॅलॅलॅ धुजूॲ हाळ त्याला दिखलॅ. “पाशा तुमसॉ जावाय धुजू भाटामीनॅ हॉतॉ तडे त्याला जनवरानॅ खालॅ आन त्याला आगायशा इस्पितळात नीलॅ. तॉडातनॅ फेस येतॅ”. आहा हांगॉन फरशा तडाक आपल्या घारा पॉसलॉ.

आख्खॉ जलाडीऑ गाव आगायशा इस्पितळात पॉसलॉ. तडे कडे का? तहेस ते धुजूआ दरी गेले. जालॉ परकार धुजूला हांगता बरबर धुजू बोयलॉ, “ या मायला त्या फरशाआ. मॅ त्या एप्रिल फूल करॅ गॅलॉ तॅ त्यानॅ मालास एप्रिल फूल कॅला”.

ई कानी ५० वहरा आदी खरी घडले. नावे बदलल्यात.

# राटया

- सिरील मिनेजिस, मेरभाट, आगाशी.

आपल्या काडोडी भाशेत अहॅ बरॅस शब्द हात जॅ आयकॉन आपल्याला कय वॅगळास आयकिल्याव भास हॉतॅ. आतॅ इस बगा ना, अॅखाद्या माहानानॅ हांगिलेल्या कामात गडबाड केली तॅ मराठी भाशेत 'काय गाढव आहे' आहा बॉलॉन त्याला गाढवाई उपमा देत्यात. पन यास गोष्टीबद्दल आपल्या भाशेमीनॅ, 'बईलुस हाय' नातॅ 'ए बईला' अही उपमा देत्यात.

पन मा मतॅ बईल अत्यंत हुशार प्राणी हाय. तॉ आपल्या धनॅइ शॅवा इमानॅ-इतबारॅ करतॅ. आन तॉ कश्टाळू हाय. मंग अॅखादया हुशार नातॅ कश्टाळू माहानाला आपुन कतॅ बईल हांगातॅव गा ? अॅखादी व्यक्ति घाबरातॅ तिगाळा, अॅखाद्या प्रश्ना उत्तर 'हा' नातॅ 'नाय' हायदॅ तॅ तॉ मुंडी हालवॉन हांगातॅ, मंग आपुन 'बईला घतीन मुंडी का हालविता' आहा हांगात्याव. याव अर्थ बईल घाबरात आहातॅ गा का ? अहॅ एक ना अनेक प्रश्न आपल्या जीवनात पडात्यात. काइक शब्द आपल्या कानोर पडात्यात आन आपुन तॅ विहरॉन जात्याव. ऑहॉस एक शब्द मा कानोर पडलॉ आन माला मा बालपान आठवला. शब्द हॉतॉ, "राटया"

आजपोत प्रत्येकानॅ 'राटया' ऑ शब्द आयकीलॅ हायदॅ. कदाचित आतॅशा पिढीला ऑ शब्द नवीनुस वाटॅदॅ, पन ऑ जूनॉस शब्द हाय. आतॅशा पिढीला ऑ राटया बगॅसॉ हायदॅ तॅ खॅळा मैदानोर जा लागॅदॅ. टिवी, मोबाइल आन कम्प्युटरवर ऑ राट्यो हापड्यासॉ नाय. या राटयाई ओळख तुमाला करॉन द्याशी ई माइ धडपड.

ऑ राट्यो आमाला लानपनी बॅटबॉलशा (क्रिकेट) मैदानोर भॅटलॉ. तिगाळशा टायमाला गावात पोरे अहॅशॅ पन क्रिकेटशी मॅच करता लागनारॅ २२ पोरे नाय जामॅशे. मंग आमे जोडे पोरे जमल्यात तॉड्या पॉरायो २ टिम पाड्याश्ये. पन अॅखाद्या टायमाला पॉराई संख्या एक हारकी नहली गा आमशी पंचाईत हॉअॅशी. मीनजॅ १५ पोरे जमले गा ७-७ जनायो २ टिम पाड्याश्यो. आतॅ वरलॅल्या अॅका पॉरा का? ऑ तॉ "राट्यो". आन ऑ राटया हॉअॅसॉ मान जमलॅल्या पॉरातशा जकल्यात बॉठ्या आन आडदांड पॉरा नशिबात यासॉ. याला कारन बी पॉरांना त्या ठॉश्याई जाम धास्ती वाटॅशी.

आतॅ या राटया काम का? तॅ ऑ दोनू टिममीननॅ बॅटिंग करॅसॉ. फिल्डिंग त्याला जमॅशी नाय बगुन ऑ विकेटकिपर रॅसॉ. कतॅ कतॅ या राट्याला एक-एक टिममीनॅ २-२ जीवदाने मीळॅशे. मीनजॅ त्याला दोन-दोनदा आहा ४ वॅळा आऊट कऱ्या लागातोता. खॅळताना खॉटा खासा (बॉलॅसा) परमनंट लायसन्स त्यादरी अहॅसा. बॅटला कट लागॉन कॅच आऊट जालॉ गा ऑ बॅट आपटॉन दावडॅसॉ. पयल्या बॉलला आऊट जालॉ गा तॉ बॉल ट्रायल बॉल हाय आहा घोशीत करॅसॉ. बॅटिंग न जमती अहली तरी कनटाळॉ या पोत खॅळॅसॉ. थॉड्क्यात का तॅ ऑ राट्यो जाकल्याना जाम पिड्येसॉ. अहॅ या खेळाडूला राटया ई नाव कडने पडला ? ऑहॉ प्रश्न माला पडॅसॉ. मा अंदाजानुसार बवतेक राटोरनॅ राटया ऑ शब्द आलॅ हायदॅ. मीनजॅ राटा काम का ? तॅ आपल्याला नॅमॉन दिलॅल्या जागॅत गपगुमान गोलगोल फिरॅसा. राटया काम पन तहास हाय.

आतॅ तुमाला वाटॅदॅ ऑ राट्यो गॅलॉ कडे ? कडेस गॅलॉ नाय. हाय. फक्त त्याई जागा बदाल्ले. मीनजॅ मैदाना खॅळातनॅ ऑ राजकारनात पॉसलॅ. आज आपुन डॉळॅ उगडॉन आजशा राजकारनोर बगीला तॅ बरॅस राटया आट्या-पाट्या खॅळताना आपल्याला दिखात्यात. या अहया राटयापासून आपुन सावध रॅला पाय. एकवेळ खॅळातसॉ राट्यो परवाडदॅ पन राजकारनातसॉ राट्यो परवाडयासॉ नाय.

# बिचारा बाबू

**शिमा लुद्रिक, आगाय**

परवा अॅका पावनॅआ घारा गॅलतॉ, त्या घारा दीड - पावने दोन वहरा पॉर हॉता भगून आठोनीनॅ डेरी मिल्क बरबर घेट्लोता. पॉस्ल्यानंतर त्या पॉराई बय (मम्मी) पॉरा हरी इंग्लिश मीनॅ बॉल्या लागली. (इंग्लिश शाळीत हिकलेल्यो मम्म्यो अहल्यो गा त्या पॉटामीनॅस बाबूला इंग्लिश या पाय आहॉ त्याऑ समज आहातॅ. "बाबू.. डू दिस, बाबू डू दॅट... बाबू से हॅलॉ टू अंकल, बाबू से एबीसीडी, बाबू ट्विंकल ट्विंकल... बाबू जॉनी जॉनी..." काल परवास सल्यादो लागलॅला (आन अजून पोत 'धावनाऱ्या') ता बिशारा बाबू सर्कसमिनशा रिंग मास्टरनॅ जाहा शाबुक घॅऑन सीट.. स्टॅंड अप.. आहा हांगता बरबर तॉ वाग नातॅ सिंव जही उठ बॅहॅ करतॅ ताहा मा पूडॅ मम्मीनॅ हिकवीलॅला इंग्लिश फाडताना माला त्या बिशारॅइ जाम दया आली.

"बाबू कॉडा हुशार हाय अंकल. जकला मस्त पीकअप करतॅ... ऑड्यातूस त्याला ABCD... 1234... बॉलता आन ओळखिता येतॅ. त्याला दिवाळीनंतर 'प्ले स्कूल' मीनॅ घालॅसॉ विसार हाय. मीनजॅ पॉरांमीनॅ जाऑन त्याला शाळीई गोडी लागॅदॅ. पूडॅ त्याला CBSC नातॅ ICSE बोर्डमीनॅ अॅडमिशन घॅसा हाय. तडे खुब लवकर अॅडमिशन घ्या लागातॅ..."

ता बाबू कॉडा ? त्याला जेमतेम सलता येतॅ. 'खॅळॅसा... मातीमीनॅ माखॅसा... दोनू हाथायॅ जीविताना आख्खा नीपॅसा, आख्ख्या घरबर होळडोळ करॅशी आहा त्या वय...' त्या पॉराला ई मम्मी आतॅस शाळीत घाल्या लागले...

जमानॉ बदललॅ ई मान्य.. बाल मानसशास्त्रानुसार (चाइल्ड सायकॉलॉजी) लान्या वयात नवा हीकॅशी शक्ति जास्ती आहातॅ. ई पन मान्य. पन त्याकरता पॉरा बालपन हिरावॉन घॅऑन त्याला जबरदस्तीनॅ जन्माला आल्या आल्यास शिक्षाण देन्याव हट्ट क्या करता ? आजकाल कुहनेस बारके पोरे मातीत खॅळात्यात, निपल्यात, शेडडीत मुतिल्यात (डायपर कहे वीकॅशॅ मंग), लांगूटे बोंधळ, नातॅ दोनू हाथाय जीविताना आख्खा आंग आन तॉड निपवीलॅलॅ कडे बगॅ मिलात नाय. खरा मीनजॅ घारा मीनॅपन डायपर घालॉन घालॉन आपुन त्या नैसर्गिक हक्कोर गदा हाडया लाविले.

मॅ मुकाळॅ मा हाथातसा कोल्ड ड्रिंकसा ग्लास पिला. जाताना त्या पॉरा हाथा "शाकलेट" दिला...
"बाबू.. से थॅंक यू टु अंकल..." बाबूनॅ तॉडाएस ता शाकलेट फॉडॉन तोपर्यंत अरदा तॉड माखविलता...
मॅ गाडीला किक मारताना.. "शी डर्टी बॉय... घरशोर कॉहॉ पडलॉ" ई कानोर पडला...

# कार्डाव जमानॉ

**सेबेस्टीन डिसोझा, सोजआळी**

“आरे दुमा कॉपात ! ऑड्या धावपळीत साल्लॉ कडे ?”
“आरे का हागॉ मिंगू कॉपात ! दुनियाबरशी जागा पडले, पन पोरे डॉकायत्यात तरी गा ? ना पॉरांना भाट माइती, ना पॉरांना हिवार माइती. पन कुपारी तुमाला मॅ एक विसरॉ गा? ता आधार कार्डसा का लफडा हाई ?”
“आरे दुमा कॉपात ! आपल्या टायमाला रेशन कार्ड हॉता आन मिंगॅ मतदान कार्ड आला आन आतॅ आधार कार्ड.”
“ई आयकॉन माला जरा बरा वाटला. कादो माइत हाय गा कॉपात, माव एक पॉर लंडनला हाय गा आन बीऑ बोरीवलीला बॉलॉकवर रॅतॅ. एक पोरी होती तीआ गॅला साला लगीन जाला आन ती हाऱ्या गेली. आतॅ असन्या बॉड्या बंगल्यात मॅ आन तुमशी कुमारी, दोगेशा दोगे रेत्याव. घर नुसता खादो उठातॅ. भगून तुमाला हागॉ गा ई आधार कार्डसा नाव आयकीला गा आन जीव हॅवसॉ जालॉ. आतॅ आमाला सरकारसॉ आधार मिळदॅ.”

"दुमा कॉपात तुमसा ता जकला रेउंदे. मॅ कालूस मा पोरीआ घारा गॅलतॉ. जावाय पोरीला हांगातॅ, "मा ता ATM कार्ड हाडॉन दे." तॅ मॅ मा पोरीला विसारला, "बाय पोरे ई कुहना ला कार्ड." तॅ पोरी बोयली, "बाबॉ ! बँकेतनॅ पैशॅ काडॅशॅ हॉतॅ ना त्यादो ई कार्ड. "कारडोरती पन पैशॅ मिळात्यात गा का आतॅ?" मॅ पोरीला विसारला. "हा ! मिळात्यात" पोरी बोयली. तॅ मॅ मादो पन कार्ड काड ना आहा तिला हांगीला तॅ पोरी हांगातॅ, "नाय बाबा ! पयलॅ बँकेत पैशॅ ठॉया लागात्यात तरुस पैशॅ काडता येत्यात."

तव माव नातू पोरीला हांगातॅ, "मम्मे मा स्मार्ट कार्ड दे ना !"

मॅ पोरीला विसारला, "आतॅ ई बी कुहणा कार्ड." पोरी बोयली, "रेल्वेआ तिकीट काड्या करता ता कार्ड लागातॅ."

ऑड्यात नातनी खोलीतनॅ आडडाली, " मम्मे ! पप्पाला हांग, मा मोबाईलसा मेमरी कार्ड हाडला पन सिम कार्ड नाय हाडला ता."

आरे दुमा कॉपात ! या जकल्या कार्डाए नावे आयकॉन मॅ विसारात पडलॉ. मा तॉड बगॉन पोरी बोयली, "बाजारात क्रेडिट कार्ड पन मिळत्यात."

काय नाय कॉपात ! आपलॉ जमानॉ खपलॉ. आतॅ जकलॉ कार्डाव जमानॉ आलॅ.

# मावली आहातोती कादो?

**शिमसन बिशामास्तर पहरावकर**

रातसॉ १.३० वाजलोतॉ. लाम कुत्रे जॉरजॉराय भॉकातोते. मांदर पन रडातोती मीनॅ मीनॅ. मॅ निजॅतनॅ जागॉ हॉऑन मॅरॅदॅरॅ डॉकायलॉ. हॉलमीनॅ लाइट पाडलेली होती. माइ नंदार कॅलेंडरवर गेली. १९८३आ वहरी धुरकाट धुरकाट दिखातोता त्यात.

त्या दिहा नांदानात मा मामारा रंगीत टिवी हाडलोतॉ. मॅ आख्खॉ दी माव प्रेमळ मनुमामाआ वँग्यात बॅहॉन टिवी बगीलता आन राती मा लाडक्या शिलूमामाआ वँग्यात हॉलमीनॅ नीजलॉतॉ. मॅरॅ मामरसॉ भॉटॉ बाबा नीजलॉतॉ. आरे पन ई का ?

आरे माज्या दॅवा ! बाबा बाजूला पांडरॉ झगॉ घायलेलॅ ३ जान कयतरी करतोते. त्यातशा ॲकानॅ मा भॉड्या बाबा जीबेओर वायर बांदिलती. दुहरॅनॅ काकयशा डॉख्योर कानामीनॅ मेमरी कार्डहारकी कयतरी वस्तु दाबॉन धरलोती. तीहरॉ भोठी बयशी पेटी उगडॉन त्याई शूटिंग करतोतॉ. मॅ जाम घाबारलॉ आन जॉराय आडडालॉ. पन कय फायदॉ जालॉ नाय. माव आवाज कुनॅतरी दाबिलतॉ कोळोक. माइ नंदार खोलीत गेली. तडेपन लाइट लाग्लोती. मॅ पटकान खोलीत धावलॉ. माइ दादय, तीयो माहाबेंनी, मावशी कंपनी ढाराढूर निजलोते. मॅ मावलीआ फोटोवर डॉकायलॉ. ती आहातोती. माला मावलीऑ राग आलॉ. आडॅ तूऑ पॉर संकाटात हापाडलॅ आन तू आहाता? मॅ ऑहॉ विसार करतॉ हाय ऑड्यात मांगॅ कुनातरी बॉलन्याव माला आवाज आलॉ. "नंदाखाल, आगाशी, शिरलय, निर्मळ, गास, भुईगाव, बोळींज परत ५० वहरे..." मॅ मांगॅ वळॉन बगीला तॅ, तॅस ३ जान.. नंतर का जाला ता कळाला नाय.

माला कुनतरी हालवॉन हालवॉन उठवितोता. माय डॉळॅ जड जालतॅ उगडातूस नॉतॅ. जहनी मॅ खुब वहरे नीजलोतॉ. मा पोरीऑ शब्द कानोर येतोतॅ, "बाबो! सल उठ. ११ वाजल्यात. निजॅसा कॉडा. मॅ जिव्यादो वालाई भाजी केले, हॅकटाई हिंग घालॉन.त्यात रॉडनी मोरो मावशानॅ धाडलेले पयलर गावठी ताते टाकील्यात. मम्मी मिंगारशा भाटात गेले. काकडॉ हिप्यादो आन मॅ साललो कॉलेजला." आन ती 'मुगले मुगले नास लो' गानॉ बॉलात गेली. मॅ सल्दॅ आहा बोयलॉ खरॉ पन नीजॅतनॅ खाडकन जागॉ जालॉ....

आरे पन इ का? आरे माज्या दॅवा..! माइ पोरी कादोडी बॉलातोती. जी आजपोत मराठी-इंग्लिश बोयली ती आज ऑडा बरा कादोडी कही का बोयली कोळोक. माइ नंदार कॅलेंडरवर गेली. २०३३ धुरकाट धुरकाट दिखातोता. पन मॅ कडे हॉतॉ ता माला कळात नॉता. ऑड्यात माळयोरनॅ आवाज एतॅ. मॅ धाव्वात तडे जातॅ पन तडे कून नहातॅ. टिवी डिश उलटी जालती आन बाजूला मेमरी कार्ड हारकी वस्तु पाड्लोती, जी माला ओळखीइ वाटली. मॅ खाला

हॉलमीनॅ आलॉ. समोरशा फोटोमिनशी मावली आहातोती. ऑड्यात माला मांगॅ कुनातरी बॉलन्याव आवाज एतॅ. मॅ मांगॅ वळॉन बगॅ ऑड्यात.... त्यानंतर का जाला ता कळाला नाय.

मा गालोर मा पोरीनॅ गॉकॉ घॅटलॉ आन बोयली, "ओके डॅड ! मी चालली शाळेत. लव यू." मॅ जागॉ जालॉ. आरे दॅवा..! मीनजॅ ऑडा बॉव्वा सपना हॉता इ तर. मॅ बायकूला आन पोरीला टाटा कॅला. घडॅल्यात ६.१० वाजलोतॅ. कॅलेंडर बगीला एप्रिल २०१४ बुधवार. मावलीऑ दी. मॅ जाम विसार कॅलॉ सप्नोर. त्याव अर्थ लाव्यासॉ. शेवटाला उलगाडॉ जालॉ. माइ कळी खुलली . मॅ हॉलमीनॅ आलॉ. फोटोमिनशी मावली जरा जास्ती आहातोती आज. मॅ पन तिला डॉळॉ मारलॉ. आभारी बॉलॉन.

## संग्राह्य

**आशा विल्सन परेरा, लानी सरगोडी गास**

१ हाथी मेरे साथी - आख्खॉ दि खातीन खाती
२ मुझे जीने दो - एक बय दो आन एक बाबा दो
३ हरियाली औऱ रास्ता - जकल्या मावऱ्यात निरुळ सस्ता
४ आग हि आग - करदीपेक्षा मान्देळे माग
५ असली नकली - घामोळ्यो फॉडॉन फॉडॉन धक्ली
६ पांडगो इलो रे बा इलो - काकानॅ हंदीवरसॉ दगड खशवीलॉ
७ अमर अकबर अँथनी - सुलीवरनॅ डेवरला गा जिव्यादो पयली
८ मेरे हुजूर - भोटीपेक्षा लानी घनी माजुर
९ श्रावणभादो - मिन्शी तुकडी इदो आन हॅपाट बगाड मादो
१० रोटी, कपडा औऱ मकान - भोंगाफाईट करॅदो मोत्या दुकान
११ देव दिनाघरी धावला - आख्खॉ दि फुगला न फुगला
१२ जब जब फूल खिले - नीजॉन नीजॉन पायतरॅ जालॅ ढिलॅ
१३ चौदावी का चाँद - हाऊ तू रांद मा पोटाई नांद
१४ जोरू का गुलाम - बारा आने बाटली जाम काम
१५ एक फूल दो माली - देवळा जाऑन आली गा गाळयो मारॅ लागली
१६ फूल औऱ काटे - पाव किलो मट्नात एक किलो बटाटे

## कुपारी म्हनी

**रिटा पॅट्रिक रिबेलो, गास**

१ हाथा तोंडासा जायदॅ, पन नशिबात जा लिवीलॅ ता नाय जासा
२ गयला नाय कून विसरी, तॅ पड्गयला कून विसरॅसॉ
३ जकला मिळदॅ, पन माहासॉ गॉळॉ नाय मिळॅसॉ
४ कॉळॅपेक्षा वारन्याला जोर घनॉस
५ हरपा बळगुटीओर पाय दिलॉ गा तॉ खायदॅस ना
६ मरॅआ वाटातॅ, पन परत वाटातॅ ई दुनिया बग्यादो परत यॅ गा
७ हुंबडी जळदॅ, पन त्याव पीळ कय जासॉ नाय
८ रान जळातॅ ताआ जग बगीतॅ, पन मन जळातॅ ताआ कून बगीतॅ
९ मुका जनावर हिकॅदॅ, पन माहनु नाय हिकॅसॉ
१० हाथाए पासू बोटे कय हारके हाथ गा
११ बेन लाख, आन बाहा मक
१२ लगीन लॉका, आन माकड फुका
१३ नवरीपेक्षा वराडनीला मान
१४ वडाला फळे आलेगा आन, कागूळॅए डॉळॅ फुटलॅ
१५ नवरॉ मॅलॅ एक दुख, आन चकोटी कॅलॅआ दुहरा दुख
१६ साविलॅबगर गिळॅ नाय, आन हांगीलॅबगर कळॅ नाय
१७ आला पोरी का बगे, पोरीई बय बग बास
१८ कुना तॅल जळातॅ तॅ कुनाव पानी जळातॅ

१९ जित्तॉ लाखाव, आन मॅलॉ सवा लाखाव

२० ज्या जळातॅ त्यालास कळातॅ, जकल्या जगाला का हांगॉन फायदॉ

२१ ज्या हाथात नानॉ, तॉ जगात शानॉ

२२ जाहा वाढला ताहास जीविन्याव गा

२३ जकला जग सुखी, आन एकली आंपार मावली दुखी

२४ होन बाय कोपे तॅ हॉना घॅऑन जाय, कुना न्या नायना, लाडकॉ जीव घॅऑन जाय

२५ घर बांदॉन दाखडा, नातॅ लगीन करॉन दाखडा

२६ सरकारशी पायरी गा, आन डॉक्टरशी पायरी सडलॉ त्या सॉक्काट सत्यानाश जालॉस

२७ गाड्यापेक्षा भाडा माग पडला

२८ ज्या आंधात हायदॅ त्यास कॉपरा फाटॅदॅ गा

२९ खाशे दात वॅगळॅ, आन हावॅशॅ वॅगळॅ

३० मॅल्याबगर सरगाई वाट कळॅशी नाय

३१ डॉळॅ फुटलॅ गा, भिबयशी आशा कादो बाळगॅशी

## नाताळ अंक प्रतिक्रिया - **सिरील मिनेजिस, मेरभाट, आगाशी.**

प्रती,

संपादक “कादोडी”

सस्नेह वंदन !

नाताळ २०१३ ऑ कादोडी अंक जकल्या अंकाव कळस. वाश्यादो मज्जा आली. खुबशॅ लेखक आपल्या भाषेत लीवितॅ जाल्यात. कवी मनाए बरॅस कवी कविता रशीतॅ जाल्यात. आतॅ आपल्याला प्रतीक्षा हाय ती वाचकाई. या वाचकाई संख्या जिगाळा वाडदॅ तिगाळा आपला ई दॅपयला पाऊल यशस्वी हॉयदॅ. आपल्या समाजाला वाचनाई गोडी लागूनदे आन “कादोडी” अंकाव तुटावडॉ पडूनदे ई मंनापासूनशी इच्छा.

या अंकमीनसा जकला लिखान खुब खुब आवाडला. नेल्सनसॉ “लाडू” न सुंबीता जाम गॉड लागलॉ. बेर्नादेतशा “हॅगाटनॅ” मनात घर कॅला. एडवर्डसा “हांबा” खुब वास्तववादी वाटला.

अंकाविषयी माव चार ओळी. -

‘शिल्पर’ घालॉन ‘मद्रास तॅ मुंबय परवास’ केल्याई ‘दुझ्रूइ’ आठोन एतॅ. ‘मा खास मयतरनीआ’ वराडाला ‘वरमाय’ घारा येतॅ तिगाळा ‘उतळी पडातॅ’ आन ‘बाबा हांगातॅ’ ‘फरशाला का जाला’ त्याला हांग ‘जागते रहो’ कारन ‘येशू ख्रिस्त परत जन्मा आलॅ’. या ‘कुपाऱ्या हनाला’ ‘डाबरेआ शान’ बरबर कादोडी भाशाव माला जाम अभिमान वाटातॅ.

## कुपारी प्रेम पत्र **रोहन फरगोज, लानी सरगोडी, गास**

मॅ हानश्या पारा भाटात जावॉन आलो गा आन कब्जा खुटीला टांगीला, मोरीत हात-पाय धॉव्यात तॉस मा बय मा पुडॅ आली, माला हांगाते, “बॅंबट्या, फरशाई हाकाळीस तब्ब्यात बरी नाय वाटातॅ, हांज जाली तरी दापुडसा दार कय उघड्या तयार नाय”. फरशा तॉहॉ माव जिवलग मित्र, कत्तेस गावश्यो पोऱ्यो त्या भानगडीत पडल्यो नाय, कारन तॉस सगळ्या भानगडीत पडातोतॉ..

मॅ तॉहॉस त्या घारा गॅलॉ, दरवाजॉ उघडॉन बगीतॅ तॅ का?, फरशा पुढ्यॅ आख्खी बाटली घॅवॉन बॅहलोतॉ, मॅ हांगीला “क रॅ, तुयी तब्ब्यात बरी नाय ना?” त्योर तॉ हांगातॅ, “अरॅ, माई नायना, त्या सोकाळश्या फरशीई बिगडले, ती पेटी उघड, त्यातशी पिवशी काढ, आन वास त्यात का हाय ता?” मॅ त्यात पत्र होता ता काडला आन वाश्या लागलॉ..

प्रिय फरशीस,

घाबरली गा ना?, बंबयला भाजीपाला अही बॉंब केली गा तडसा लोक आहास घाबरातॅ, माई सोनू, तुला मॅ हॉपारश्या बाजारात बगीला गा आन भाजी विकता विकता मा काळीजूस मॅ विकॉन बॅहलॉ. मॅ तुला बाळाआ हॉटेलशी शार रुपयाशी जिलेबी खावड्योती पन बयला हिशोब द्या लागातॅ, त्यात कय घोळ जालोसॉ तॅ तिने माई पाठ फोडलोशी...

तुला मॅ हॉपारश्या बाजारात बगीला आन माई नजर तूऑर एकशिती झाली, तुआ रूपाआ वर्णन कऱ्या मॅ कय लेखक-कवि नाय, आपला शिकशान कॉडा, माइती हाय ना.. मॅ एक सादॉ पासवालॉ, पन तुस कय माला आवडली ईस माला उमजे नाय.. मा बाबाआ काळ्या टोपी गत तुये काळॅ केस, भाटाश्या पिकल्या तांबोटयाघत तुयॅ लाल भडाक ओठ, मिंगरश्या हॅगटावरशी सडसडीत हिंगा हारखी तू, इ सगळा बगीला आन मायी शुद्या गेली.

मॅ तुला गॅल्या बिशीतवारपासून हॉपाऱ्यात बगीतॅ, माऑ बाजार नहलॉ तरी मॅ बाजारा येतॅ, तुला न विसारता पत्र धाडला भगून गिराकानॅ भाजीओ भाव कॅलॉगा जहॉ पासवाल्याऑ संताप हॉआतॅ तहॉ तुऑ जालॅ हायदॅ, पण दिखली पोरी गा धाडला प्रेमपत्र अही आपली फॅशन हाय. दिखला गिराक गा मारली हाक ताहा.. जहॉ मॅ गिराकायॅ हुट्टे पैशे मा दरी ठवितॅ तहास तू मा काळीज तू दरी ठव.

फरसुले, तुऑ बाबा कहॉ हाय? अय त्या तब्बेतीई चवकशी करी नाय मॅ, मंजे गाडीश्या टीशी घतीन नाय ना.. मॅ लगेज तिकीट काडी नाय, आन माला फक्त एक टीशी गा आन बी जवान पोरीआ बाबाऑ घाबरॉ वाटातॅ. मा लाडक्या फरशे, तू जर माला नाय हंगिला ना तर मॅ पिवरशी आख्खी बाटली दारू पानी न घालता पॅवॉन जीव देनॅ. आपल्या प्रेमाई गाडी एकदाशी विरारवरनॅ हुटली गा मॅ वांद्र्या जाऑन मोतमावलीला हार घालनॅ.. तू माई कावड आन त्याला अडकविलेला मॅ हिका.. तू मा टोपला आन मॅ त्यातसा बोस्का...

फक्त तुऑ
फरशा पासवालॉ..

इ पत्र वाशिला गा आन मॅ पन फरशादरनॅ एक पेग मांगीलो आन दुहरा पत्र वाशया घेतला

प्रिय फरशा,
हाता कोपऱ्यापासून नमस्कार,

तू माला प्रेमपत्र धाडला त्याबद्दल आभार, माला पयला आहा कूनॅ प्रेमपत्र धाडला नॉता, मा आहा कुनातरी हरी जमला पाय त्यात्यान मॅरदारश्याव बाजार घॅवॉन मॅ होपाऱ्या येतॅ. तडॅ खुब जना जमलॅ आहा माइती पडलॅ. मा यॅन्याव फायदॉ झालो आहा वाटातॅ, माला एखादॉ चिकनॉ, आगाशीश्या फुलावाळ्या घत पॉर पावतॉ पन आत्ये वाट बगन्यात कय अर्थ नाय, जाउन्दे, दातळ नाय तॅ आतॅ हुतेरीओर भागव्या लागॅ.

तुआ पत्र याश्या पुढनॅ मॅ फक्त तुऑस विसार कऱ्याशी, पन तूआ पत्र वाशिला गा आन मा घटनोरनॅ नांगर वालॉ, माला पयले हॉपारश्ये भैय्या आन दापुडसॉ झ्याव दोगीस वात्रट वाट्याशे.. अरॅ झडल्या-खडल्या, लोकाये भाटशे नाळ पाडता तुयॅ दी गॅलॅ, माशीन तुला तुआ कावडीओर घना प्रेम हाय वाटातॅ आ आन माई बरोबरी कया हरी केले?, मायॅ केस तूआ बाबा फाटल्या टोपीघत हात गा का?, मा ओठाला कय तांबोटया फूल आलता गा का? आन मा बाबाआ विसरो नाका, तॉ माला गाहाश्या तळ्यात बुडविदॅ, पन तू हारक्या घारा द्यासॉ नाय..

तूआ पत्र वाश्याश्या अगोदर माऑ तूओर खुब जीव आलतॉ, फुग्यात आम घायलॉ गा फुगॅ कहॅ हॉवात्यात ताहा मा जालता, पन पत्र वाशिला आन वालाई भाजी पामाल्या घत जाला. पत्रात माशीन घना तू तूआ बंबयसास लीविले, अरॅ, तूआ बयश्या आंगाई दोदिकावड जालॅ आन तू माला कावड हांगाता..

मॅ तू हारक्या निंबरमुंड्याहरी प्रेम कऱ्याशी नाय, जहा कडू किरायता कुनाला आवडॅ नाय, ताहा माला तू कत्तेस आवड्यासॉ नाय. तू पत्र लीविला नस्ता तॅ मॅ तूओर प्रेम केलोस्ता, या पत्राबरबर मॅ तूआ पत्र पन परत धाडलॅ, दापुडसा कॉमडा फॅडयादो लागू पडॅदॅ..

कु. फरशी
आठवी पास.

पत्र वासोन होयापोत काळोख पड्या लागलोतो, मा पन डोळ्योर धुंदी या लागलोती पन फरशाआ डोळ्यात फरशी होडोन दुहऱ्या प्रेमाई चमक या लागलोती...

## कुपारी पाऊल पडातॅ पुडॅ...!!



अजुन एक कुपारी साल्लो आपल्या मायभूमीआ सेवेला.

**विनीत जॉन परेरा, नंदाखाल-खिवनी** याई भारतीय सैन्यदलात शॉर्ट सर्व्हिस कमीशन टेक्निकल विभागात (एस्.एस्.सी. टेक -४२) ३०,५०० उमेदवारातने निवड जाले. त्याव ईलेक्ट्रॉनिक्स कम्यनिकेशन्स या विभागात दुहरॉ क्रमांक आलॉ. आतॅ त्याई ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमी, चेन्नईला ११ मयन्याई ट्रेनिंग सुरू हाय आन मंग तॉ आपल्या सैन्यदलात लेफ्टनंट पदोर रुजू हॉयदॅ.

विनीत तुआ आन तुआ जकल्या कुटुंबा अभिनंदन आन हुक्काळी शुभेच्छा!

### अंकाकरता देणगी

एलायस तुस्कानो, घोटकाल, नंदाखाल - ५०० रु.
नोएल फर्नांडिस, मर्देस - ५०० रु.
लुझान फ्रँक डिसोझा, सोज आळी - १०० रु.
शिला जॉनी डिसोझा, सोज आळी - १०० रु.
सेबेस्टियन डिसोझा, सोज आळी - १०० रु.
ट्रिजा डिसोझा, सोज आळी - १०० रु.
रूपेश रोझारीओ, भागाळी - १०० रु.
आनंद रुमाव, रुमाव आळी - १०० रु.
जॉर्डन रुमाव, नवाळा, निर्मळ - १०० रु.
लिआ सॅम्युएल आल्मेडा, शिडी, नानभाट -१०० रु.
शिला मस्करणीस, राजणी आळी, -१०० रु.
लेस्ली मस्करणीस, राजणी आळी, -१०० रु.
विलास मस्करणीस, राजणी आळी, -१०० रु.
पिटर मस्करणीस, राजणी आळी, -१०० रु.
सायमन मस्करणीस, राजणी आळी, -१०० रु.
ब्रायन कजार - राजणी आळी, -१०० रु.
रोमन कजार - राजणी आळी, -१०० रु.
मार्शल कजार - राजणी आळी, -१०० रु.

### स्वेच्छा मूल्याद्वारे जमा झालॅलॅ पैशॅ

राजणी आळी, वाघोली - ४२६ रु.

घोसाळी - ७८० रु. दोनतलाव - ६१० रु.

मेरभाट, आगाशी - ५२० रु.

नवाळा, निर्मळ - ४०० रु. सॉकाळा - ३८० रु.

पहराव - ३४० रु. नंदनवन - २२० रु.

रांबाई - २०० रु. बानभाट - १८६ रु.

दोडती आळी - १८० रु. सोजआळी - १४० रु.

वटार-बारोडी - १२० रु. मावंडा - १२० रु.

भागाळी - ११० रु. माळीआळी - १०० रु.

पोंडा - ६० रु.

## IT PROJECTS

Get all the IT Projects Guidance You Need!!!

We provide you full guidance in software Projects and help you understand those projects too. Our representatives personally guides you to help you, in understanding of entire projects. Now just select a project and get started here!

77 38 350 114,
99 20 171 421
dsouzamacson@gmail.com


# आमी कुपारी

**जयेश लहानसरगोडीकर, गास**

पश्चिम वसईशे जकले आमी कुपारी
संकृती टिकव्याशी घेतले आमॅ होपारी

हॉन्याहारकी परंपरा आमश्या संस्कृतीत
खाऑन पॅवॉन मजा आमश्या करतूतीत

डोकरे-डाकरे हजात्यात पोन्यानॅ
रान्यो मिरवात्यात लाल लुगड्यानॅ

रीतिरिवाज कहॅ एकदम पद्धतशीर
आमशे हनापेक्षा नायके मजेशीर

हनावेळा फुगॅ, रोटयो आण करजी
आयतवारॅ चिकन मटन नातॅ बुरजी

सगळे झाल्यात कुपऱ्यायॅ फॅन
आमशी संस्कृती हिस आमशी शान

# आठोन



**ख्रि. जॉना अंतोन रॉड्रिग्ज, अटोळी - नानभाट**
**जन्म :- ११ फेब्रुवारी १९३५**
**मृत्यू :- २६ सप्टेंबर २०१२**



**ख्रि. शांतियाग संज्याव डिमोन्टी, माडीभाट - आगाशी**
**जन्म :- २२ सप्टेंबर १९५४**
**मृत्यू :- १६ मार्च २०१३**

*"पुनरुत्थान व जीवन मीच आहे;*
जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला तरी जगेल"
(योहान ११.(२५:

**देणार :- श्री. अंतोन गोट्या रॉड्रिग्ज,**
**श्रेयस, अटोळी - नानभाट**

**MARY** Computers

# मेरी

## All types of Graphics Design & Artwork

Digital, Screen & Offset Printing

सगळयाना हॅप्पी इस्टर

*Happy Easter !*

**Sales : Desktop | Laptop | Monitors |**
**Printers | Upgrade Installation | Accessories**

**Pro. : Lloyd Lopes**
**lloydlope@gmail.com**

**Shop Time : Daily 9.30am to 8-30pm**
**FRIDAY & SUNDAY : 9.00 AM to 1.30 PM**

**4, Royce Bldg, St. James Church Road, Near Hospital, Agashi, Virar (W) Pin 401 301**

---

**Urgent**
**Sign Names**
**Available**

सगळयाना हॅप्पी इस्टर

*Happy Easter !*










# नागरीक
## Laser Design



**सर्व प्रकारची सुबक नावे**
**तयार करून मिळतील.**

**ACRYLIC CUTTING**
**ACRYLIC TROPHY Transport NO PLATE**
**WOOD ENGRAVING CUTTING**
**ACRYLIC , PLYWOOD , LGP, MDF**
**ADVERTISING DECORATION MATERIAL**

**संजय मिनेजीस**
**9850740515**
आगाशी, क्रॉसनाका, विरार वेस्ट